**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
**E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

---

**प्रेस नोट** दिनांक :- १९/०९/२०२३

# नाशिक ग्रामीण पोलीसांतर्फे उत्कृष्ट गणेश मंडळांना पारितोषिके

---

नाशिक ग्रामीण घटकात एकूण ३४४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आपल्या गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे.

आपल्या मौलिक कामगिरीच्या बळावर जिल्ह्याच्या सामाजिक जडणघडणीमध्ये सकारात्मक भर घालणा-या गणेश मंडळांचा सन्मान व्हावा या दृष्टीकोनातून, नाशिक ग्रामीण पोलीसांनी अशा उत्कृष्ट कार्य करणा-या गणेश मंडळांना विविध पारितोषिके देऊन सन्मानित करण्याचे नियोजन केले आहे.

याकामी प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीतील सार्वजनिक गणेश मंडळाचे परीक्षण करण्यासाठी एक परीक्षण समिती गठित करण्यात येईल. अशी समिती त्या-त्या पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व परवानाधारक सार्वजनिक गणेश मंडळांचे खालील पाच मुद्द्यांवर परीक्षण करेल.

१) उत्कृष्ट गणेश मूर्ती
२) उत्कृष्ट आरास/देखावा
३) राबविलेले समाजोपयोगी कार्यक्रम
४) पोलीसांचे पाळलेले निर्देश
५) विसर्जन मिरवणूक शिस्तबद्धता

प्रत्येक पोलीस स्टेशन मधून वरील प्रत्येक मुद्द्यांवर एका गणेश मंडळाची निवड करण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील पाचही प्रकारात सर्वोत्कृष्ट ठरणा-या एका गणेश मंडळास संबंधीत पोलीस स्टेशनचे पातळीवरील गणराया अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येईल. पोलीस अधीक्षक यांचे कडून सन्मानपत्र व सन्मान चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.

त्याचप्रमाणे प्रत्येक पोलीस ठाणे पातळीवर सर्वोत्तम ठरलेल्या गणेश मंडळांचे परीक्षण जिल्हा पातळीवरील परीक्षण समिती करेल व त्यातून एकूण पाच मंडळांची जिल्हा पातळीवरील पारितोषिकांसाठी निवड करण्यात येईल. यात सर्वोत्तम ठरणा-या गणेश मंडळास जिल्हा गणराया अवॉर्ड (नाशिक ग्रामीण) देऊन सन्मानित करण्यात येईल.

जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांनी ध्वनी मर्यादेचे उल्लंघन टाळून पोलीसांनी वेळोवेळी दिलेले निर्देश पाळावेत व विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबवून समाजाच्या सकारात्मक जडणघडणीस आपला हातभार लावावा असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.